पर्यावरणीय सार्वजनिक सुनावणीचे इतिवृत्त

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित पुणे रिंगरोड विस्तार पूर्व संरेखन भाग-२) प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक सार्वजनिक सुनावणीचे इतिवृत्त

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित पुणे रिंगरोड विस्तार पूर्व संरेखन (भाग-२) प्रकल्पाची पर्यावरण विषयक सार्वजनिक जनसुनावणी गुरुवार, दिनांक ३०/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता आंबेकर लॉन्स, पुणे,हडपसर,सासवड रोड, जुने सकाळ प्रेस शेजारी, घाट पायथा, दिवे, वडकी, ता. हवेली, जि. पुणे येथे आयोजित करण्यात आली.

सदर जनसुनावणी **मा. ज्योती कदम, अतिरिक्त जिल्हा दंडाधिकारी, पुणे** यांच्या अध्यक्षतेखाली जनसुनावणी समितीचे सदस्य **श्री. बाबासाहेब कुकडे, क्षेत्रीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे, श्री. नवनाथ अवताडे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-२,** तसेच **श्री. कार्तिकेय लंगोटे, उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे-१** व यांच्या उपस्थितीत पार पाडण्यात आली.

यावेळी प्रकल्प प्रस्तावकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत विविध संस्था, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी व कर्मचारी, तसेच स्थानिक नागरिक उपस्थित होते.

समिती अध्यक्षांच्या परवानगीने श्री. कार्तिकेय लंगोटे यांनी उपस्थितांना प्रकल्पाची माहिती देऊन पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणी आयोजित करण्यामागील उद्देश स्पष्ट केला. त्यांनी नमूद केले की, पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर २००६ व त्यानंतरच्या सुधारित अधिसूचनांनुसार सदर प्रकल्प हा अनुसूचीतील क्र. ७(f) अंतर्गत -श्रेणी B१° मध्ये मोडतो.

पुणे रिंगरोड विस्तार पूर्व संरेखन (भाग-२) या विद्यमान प्रकल्पास या पूर्वीही राज्य पर्यावरण प्रभाव मूल्यांकन प्राधिकरण (SEIAA) यांचेकडून पर्यावरणीय मंजुरी (EC) क्रमांक EC२३B०३४MH१३९९६९ दिनांक ०९/०१/२०२३ रोजी प्राप्त झाली असल्याचे नमूद करण्यात आले. सदर प्रकल्पाची एकूण लांबी ६६.५ कि.मी. आहे.

प्रस्तावित विस्तार प्रकल्पासाठी पूर्व पर्यावरणीय मंजुरीसाठी आवश्यक संदर्भ अटी (Terms of Reference § TOR) राज्य तज्ञ मूल्यांकन समिती-१ (SEAC-१) यांचेमार्फत मान्य करण्यात आल्या असून, TOR ओळख क्रमांक TO२५B३६०२MH५७४८५७२N दिनांक १९/१०/२०२५ रोजी प्रदान करण्यात आला असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

१. मा.ज्योती कदम – अध्यक्ष
निवासी उप जिल्हाधिकारी /
अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे

२. श्री. बाबासाहेब कुकडे – समिती सदस्य
प्रादेशिक समन्वय अधिकारी,
एमपीसीबी. बोर्ड, पुणे

३. श्री. कार्तिकेय लंगोटे – समन्वयक
उपप्रादेशिक अधिकारी,
एमपीसीबी, पुणे-१

४. श्री. नवनाथ अवताडे – समिती सदस्य
उप प्रादेशिक अधिकारी,
म.प्र. बोर्ड, पुणे-२

पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (EIA) अधिसूचना दिनांक १४ सप्टेंबर २००६ व त्यानंतरच्या सुधारित अधिसूचनांनुसार, प्रस्तावित प्रकल्पाच्या पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणीबाबतची सूचना जनसुनावणीच्या किमान ३० दिवस अगोदर स्थानिक मराठी **दैनिक लोकसत्ता** तसेच राष्ट्रीय **इंग्रजी दैनिक इंडियन एक्सप्रेस** मध्ये दिनांक २६/०३/२०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर सूचनेनुसार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळामार्फत प्रस्तावित पुणे रिंगरोड विस्तार पूर्व संरेखन (भाग-२) प्रकल्पाची सार्वजनिक जनसुनावणी गुरुवार, दिनांक ३०/०४/२०२६ रोजी दुपारी १२.०० वाजता आंबेकर लॉन्स, पुणे, हडपसर,सासवड रोड, जुने सकाळ प्रेस शेजारी, घाट पायथा, दिवे, वडकी, ता. हवेली, जि. पुणे येथे आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती जनतेस देण्यात आली होती.

तसेच, पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन अहवाल (EIA Report) व त्याचा कार्यकारी सारांश (Executive Summary) इंग्रजी व मराठी भाषेत सार्वजनिक अवलोकन व अभिप्रायासाठी खालील शासकीय कार्यालयांमध्ये उपलब्ध करून देण्यात आले होते :

१) जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे.

२) जिल्हा उद्योग केंद्र, पुणे.

३) जिल्हा परिषद कार्यालय, पुणे.

४) प्रादेशिक कार्यालय व उपप्रादेशिक कार्यालय, पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, जोग

सेंटर, वाकडेवाडी, पुणे.

५) सदस्य सचिव कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ (मुख्यालय), सायन (पूर्व), मुंबई.

६) पश्चिम मध्य विभागीय कार्यालय, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नागपूर.

७) पर्यावरण विभाग, मंत्रालय, मुंबई.

८) तहसील कार्यालये - खेड, हवेली, पुरंदर व भोर, जि. पुणे.

९) उपविभागीय अधिकारी कार्यालये , खेड, हवेली, पुरंदर व भोर, जि. पुणे.

१०) संबंधित ग्रामपंचायत कार्यालये, ता. खेड, हवेली, पुरंदर व भोर, जि. पुणे अंतर्गत प्रकल्पग्रस्त गावे.

११) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अधिकृत संकेतस्थळावर मराठी व इंग्रजी भाषेतील कार्यकारी सारांश उपलब्ध करून देण्यात आला होता.

प्रस्तावित प्रकल्पासंदर्भात नागरिकांना त्यांच्या सूचना, हरकती अथवा निवेदने लेखी स्वरूपात महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या प्रतिनिधीकडे सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. प्राप्त होणारी सर्व निवेदने व सूचना पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांसमोर विचारार्थ सादर करण्यात येतील, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

तसेच, सार्वजनिक जनसुनावणीदरम्यान तोंडी स्वरूपात प्रश्न किंवा सूचना मांडू इच्छिणाऱ्या व्यक्तींनी आपले नाव व गावाचे नाव स्पष्टपणे नोंदवून सादरीकरणानंतर समितीसमोर आपली मते मांडावीत, असे सूचित करण्यात आले. उपस्थित नागरिकांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांना प्रकल्प प्रस्तावक तसेच नियुक्त पर्यावरणीय सल्लागार यांच्याकडून समाधानकारक उत्तरे देण्यात येतील, असेही नमूद करण्यात आले.

सदर जनसुनावणीची संपूर्ण कार्यवाही व इतिवृत्त महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत तयार करून पर्यावरण व हवामान बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी सादर करण्यात येईल, अशी माहिती समन्वयकांनी दिली.

पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणी समितीने स्पष्ट केले की, समितीची भूमिका ही जनतेकडून प्राप्त होणारी मते, सूचना व हरकती नोंदविण्यापुरती मर्यादित असून, प्रस्तावित प्रकल्पास मान्यता देणे अथवा कोणत्याही प्रकारच्या शिफारसी करणे हे समितीच्या अधिकारक्षेत्रात येत नाही. सुनावणीदरम्यान प्राप्त झालेल्या सर्व सूचना, हरकती व अभिप्राय यांचा समावेश बैठकीच्या इतिवृत्तात नमूद करण्यात येईल, असे नमूद करण्यात आले.

यानंतर पर्यावरणीय सार्वजनिक जनसुनावणी समितीच्या अध्यक्षांनी उपस्थित सर्वांचे स्वागत केले व प्रकल्प अधिकारी तसेच त्यांच्या तांत्रिक सल्लागारांना प्रकल्पाची माहिती, विशेषतः पर्यावरणीय उपाययोजना, शासकीय भाषा तसेच स्थानिक मराठी भाषेत स्पष्टपणे सादर करण्याच्या सूचना दिल्या. तसेच उपस्थित नागरिकांनी निर्भयपणे आपली मते, हरकती व सूचना नोंदवाव्यात, असे आवाहन करण्यात आले.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्प प्रस्तावकांनी नियुक्त केलेल्या तांत्रिक सल्लागारांनी प्रस्तावित प्रकल्पाची संक्षिप्त माहिती सादर केली. त्यानंतर प्रकल्पाच्या विविध पर्यावरणीय बाबी, संभाव्य परिणाम व त्यावरील उपाययोजना याविषयी सविस्तर माहिती देण्यात आली. सादरीकरणादरम्यान, प्रस्तावित पूर्व संरेखनाची सुरुवात सोलू गाव येथून अक्षांश १८'३९'५८.८३" उत्तर व रेखांश ७३'५६'८.३३" पूर्व (CH ३८+३४०) पासून होत असल्याचे नमूद करण्यात आले.

प्रकल्प स्थळाच्या परिसरातील भूप्रदेश प्रामुख्याने सपाट असून काही भाग डोंगराळ स्वरूपाचा आहे. बहु-स्पेक्ट्रल उपग्रह प्रतिमांच्या आधारे अभ्यास क्षेत्रातील भू-वापर व भू-आच्छादनाचे विश्लेषण करण्यात आले. त्यानुसार, एकूण अभ्यास क्षेत्रापैकी ४८.७७% (९३७.६५ चौ.कि.मी.) क्षेत्र कृषी भू-वापराखाली असून हा प्रमुख भू-वापर प्रकार असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर बांधकामाधीन क्षेत्राचा वाटा २०.६३% (३९६.७१ चौ.कि.मी.) इतका असून, जलस्त्रोत क्षेत्राचा वाटा सर्वात कमी म्हणजे ०.९२% (१७.६३ चौ.कि.मी.) आढळून आला.

भू-आच्छादन प्रकारांमध्ये पडीक जमीन हा प्रमुख प्रकार असून त्याचे प्रमाण २९.४६% (५६६.४१ चौ.कि.मी.) इतके आहे. त्यानंतर जंगल क्षेत्राचे प्रमाण ०.२३% (४.३८ चौ.कि.मी.) इतके आढळले. जलस्त्रोतांमध्ये नदी/ओढे हे भू-आच्छादन प्रकारांतर्गत, तर तलाव/जलाशय/टाकी/कालवे हे भू-वापर प्रकारांतर्गत समाविष्ट करण्यात आले असून त्यांचे एकत्रित क्षेत्र ०.९२% (१७.६३ चौ.कि.मी.) इतके आहे.

आयसीएआर (ICAR) यांच्या मातीच्या गुणवत्तेच्या रासायनिक वर्गीकरणानुसार अभ्यास क्षेत्रातील माती मध्यम ते उच्च उत्पादक श्रेणीत मोडते. तसेच टंडन एच.एल.एस. (Tandon H.L.S.) यांच्या माती सुपीकता वर्गीकरणानुसार अभ्यास क्षेत्रातील माती उच्च सुपीक श्रेणीत वर्गीकृत करण्यात आली आहे. व्यावसायिक परिसर वगळता निवासी तसेच औद्योगिक क्षेत्रांमध्ये ध्वनी प्रदूषणाची पातळी समाधानकारक असल्याचे निरीक्षण नोंदविण्यात आले.

श्री. प्रितेश घडिगावकर यांनी आपल्या सादरीकरणाचा समारोप करताना नमूद केले की, प्रस्तावित एक्स्प्रेसवे प्रकल्पामुळे विदर्भ, मराठवाडा, पुणे आणि कोकण या प्रदेशांदरम्यान जलद, सुरक्षित, सुरळीत व कार्यक्षम दळणवळण सुविधा उपलब्ध होणार आहेत. यामुळे प्रवासाचा वेळ कमी

होऊन रस्ता सुरक्षेत वाढ होईल. तसेच वाहतूक कोंडी, इंधनाचा वापर व वाहनांमधून होणारे उत्सर्जन कमी होण्यास मदत होऊन प्रदूषण नियंत्रणास हातभार लागेल.

त्यांनी पुढे नमूद केले की, हा प्रकल्प कृषी बाजारपेठेची उपलब्धता सुधारून शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनास योग्य बाजारभाव मिळण्यास सहाय्य करेल. तसेच गुंतवणूक वाढीस चालना मिळून प्रादेशिक आर्थिक विकासास गती मिळेल आणि वाहन संचालन व देखभाल खर्चात घट होईल. प्रस्तावित संरेखनामध्ये विश्रांती केंद्रे, पादचारी व जनावरांसाठी अंडरपास, वन्यप्राणी मार्ग, वृक्षारोपण व सुशोभीकरण, आपत्कालीन वैद्यकीय सुविधा, दूरसंचार सुविधा, वाहतूक सहाय्यता केंद्रे तसेच शक्य त्या ठिकाणी रस्ते प्रकाश व्यवस्था अशा विविध सार्वजनिक सुविधा व सुरक्षा उपाययोजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला आणि पर्यावरण सल्लागार आणि प्रकल्प प्रस्तावक यांनी दिलेली उत्तरेः**

श्री. कार्तिकेय लंगोटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे यांनी नमूद केले की, जनसुनावणीदरम्यान उपस्थित करण्यात आलेल्या सर्व प्रश्न, सूचना व आक्षेप यांची संबंधित ग्रामस्थांची नावे, पत्ते व संपर्क तपशीलांसह बैठकीच्या इतिवृत्तामध्ये नोंद करण्यात येईल. सदर इतिवृत्त मंजुरीसाठी अध्यक्ष महोदयांकडे सादर करण्यात येईल व अध्यक्षांच्या मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी शासनाकडे पाठविण्यात येईल. तसेच, जनसुनावणी प्रक्रियेचे थेट ध्वनिचित्रांकन (लाईव्ह रेकॉर्डिंग) तसेच छायाचित्रण करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**प्रश्न क्र. १**

**मा. ज्योती कदम**
निवासी उप जिल्हाधिकारी / अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, जनसुनावणी समिती

**प्रश्नः**
मा. अध्यक्ष महोदयांनी निदर्शनास आणून दिले की, प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान नियुक्त कंत्राटदारांकडून संबंधित जमीनमालकांची पूर्वपरवानगी न घेता गावकऱ्यांच्या खाजगी जमिनीवर उत्खनन अथवा इतर कामे करण्यात येत असल्याबाबत काही प्रकरणांमध्ये तक्रारी प्राप्त होतात. अशा परिस्थितीत बाधित व्यक्तींच्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी कोणती कार्यपद्धती अवलंबिण्यात येणार आहे तसेच संबंधित कंत्राटदारांविरुद्ध कोणती सुधारात्मक व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे, याबाबत सविस्तर स्पष्टीकरण मागविण्यात आले.

**उत्तर देणारे : श्री. गायकवाड सर**

उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)

**उत्तर:**

श्री. गायकवाड यांनी उत्तरादाखल स्पष्ट केले की, प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटदारांना प्रकल्पाशी संबंधित कामे केवळ मंजूर प्रकल्प हद्दीमध्ये व अधिकृतरित्या अधिग्रहित क्षेत्रामध्येच करण्याबाबत सक्त निर्देश देण्यात येतील. कोणत्याही परिस्थितीत संबंधित जमीनमालकांची पूर्वसंमती अथवा आवश्यक वैधानिक प्रक्रिया पूर्ण केल्याशिवाय खाजगी जमिनीवर कोणतेही उत्खनन किंवा बांधकामात्मक कार्य करण्यास परवानगी दिली जाणार नाही.

तसेच, खाजगी मालमत्तेवर अनधिकृत हस्तक्षेप, उत्खनन किंवा नुकसान झाल्याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त झाल्यास, सदर प्रकरणाची प्रकल्प प्रवर्तकांकडून तात्काळ चौकशी करण्यात येईल. चौकशीअंती संबंधित कंत्राटदार दोषी आढळल्यास, त्यांच्याविरुद्ध करारातील अटी व शर्ती तसेच लागू असलेल्या कायदेशीर तरतुदींनुसार आवश्यक दंडात्मक व सुधारात्मक कारवाई करण्यात येईल.

याशिवाय, बाधित ग्रामस्थांकडून प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे निराकरण करण्यासाठी प्रस्थापित तक्रार निवारण यंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल व प्राप्त तक्रारींवर वेळोवेळी योग्य कार्यवाही केली जाईल. प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान अशा प्रकारच्या घटना टाळण्यासाठी आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना काटेकोरपणे राबविण्यात येतील, असेही त्यांनी नमूद केले.

**प्रश्न क्र. २**

**मा. ज्योती कदम**

निवासी उप जिल्हाधिकारी / अतिरिक्त जिल्हाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, जनसुनावणी समिती

**प्रश्न:**

मा. अध्यक्ष महोदयांनी निर्देशित केले की, प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या कोणत्याही कंत्राटदारामार्फत उत्खनन, बांधकाम साहित्याची वाहतूक अथवा प्रकल्पाशी संबंधित इतर कोणतीही कामे हाती घेण्यापूर्वी संबंधित शासकीय विभागांकडून आवश्यक परवानग्या, ना-हरकत प्रमाणपत्रे व वैधानिक मंजुरी प्राप्त करण्यात याव्यात. तसेच, शासनास देय असलेली रॉयल्टी, शुल्क व इतर वैधानिक देयके प्रचलित नियमांनुसार नियमितपणे भरली जातील याबाबत खात्री करण्याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात आला.

उत्तर देणारे : श्री. गायकवाड सर
उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)

उत्तर:

श्री. गायकवाड यांनी उत्तरादाखल स्पष्ट केले की, प्रकल्पासाठी नियुक्त करण्यात आलेल्या सर्व कंत्राटदारांना कोणतेही उत्खनन, बांधकाम साहित्याची वाहतूक अथवा इतर प्रकल्प-संबंधित कामे सुरू करण्यापूर्वी संबंधित सक्षम शासकीय प्राधिकरणांकडून आवश्यक त्या सर्व परवानग्या, मंजुरी व वैधानिक अनुज्ञप्ती प्राप्त करणे बंधनकारक करण्यात येईल.

तसेच, प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या बांधकाम साहित्याच्या उत्खनन, खरेदी व वापरासंदर्भात शासनास देय असलेली सर्व रॉयल्टी, कर, शुल्क व इतर वैधानिक देयके प्रचलित कायदे, नियम व शासन निर्देशांनुसार नियमितपणे अदा करण्यात येतील, असे त्यांनी नमूद केले.

प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान पर्यावरणीय व वैधानिक अटींचे काटेकोरपणे पालन करण्यात येईल तसेच संबंधित विभागांशी समन्वय राखून सर्व प्रक्रिया नियमबद्ध पद्धतीने पूर्ण करण्यात येतील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

प्रश्न क्र. ३

श्री. कार्तिकेय लंगोटे
उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे
प्रश्न :

बांधकाम कालावधीत होणाऱ्या धूळ प्रदूषणाचे नियंत्रण प्रकल्प प्राधिकरणामार्फत कोणत्या प्रकारे करण्यात येणार आहे तसेच प्रस्तावित पुणे रिंगरोडच्या दुतर्फा पुरेशी वृक्षलागवड करून परिसरातील गावे व रहिवाशांवरील पर्यावरणीय परिणाम कमी करण्यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येणार आहेत, याबाबत माहिती विचारण्यात आली.

उत्तर देणारे : श्री. गायकवाड सर
उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)

उत्तर :

श्री. गायकवाड यांनी उत्तरादाखल स्पष्ट केले की, प्रकल्पाच्या बांधकाम टप्प्यात धूळ व इतर पर्यावरणीय प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या सर्व शमन उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात येतील. यामध्ये बांधकाम स्थळी नियमित पाणी फवारणी करणे, वाहतुकीदरम्यान बांधकाम साहित्य

झाकून वाहतूक करणे, कच्च्या रस्त्यांवर वाहनांच्या वेगावर नियंत्रण ठेवणे तसेच बांधकामासाठी वापरण्यात येणाऱ्या यंत्रसामग्रीची नियमित देखभाल करून उत्सर्जन कमी करणे यांचा समावेश असेल.

तसेच, प्रस्तावित रस्त्याच्या मुख्य संरेखनासह सेवा रस्त्यांच्या दुतर्फा मोठ्या प्रमाणावर वृक्षलागवड करण्यात येईल. उपलब्ध जागेनुसार हरित संरक्षक पट्टे (Green Buffer Zones) विकसित करण्यात येऊन परिसरातील गावांवर व रहिवाशांवर होणारा पर्यावरणीय परिणाम कमी करण्याचा प्रयत्न करण्यात येईल.

याशिवाय, पर्यावरण संरक्षणासंदर्भातील सर्व उपाययोजनांचे बांधकाम कालावधीत नियमित निरीक्षण करण्यात येईल व निर्धारित पर्यावरणीय मानकांचे काटेकोर पालन सुनिश्चित करण्यात येईल, असेही त्यांनी नमूद केले.

**प्रश्न क्र. ४**

**मा. ज्योती कदम**

निवासी उप जिल्हाधिकारी / अतिरिक्त जिल्हाधिकारी, Pune तथा अध्यक्ष, जनसुनावणी समिती

**प्रश्न:**

मा. अध्यक्ष महोदयांनी प्रकल्पासाठी आजपर्यंत करण्यात आलेल्या रॉयल्टी भरण्याच्या स्थितीबाबत माहिती विचारली. तसेच, रॉयल्टी संदर्भातील अहवाल नियमानुसार तयार करून संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यात आले आहेत काय, याबाबत चौकशी करण्यात आली. याशिवाय, या संदर्भात कोणतीही प्रकरणे अथवा अहवाल प्रलंबित आहेत काय, याबाबत तपशील सादर करण्यास सांगण्यात आले.

**उत्तर देणारे : श्री. गायकवाड सर**

उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)

**उत्तर:**

श्री. गायकवाड यांनी उत्तरादाखल नमूद केले की, प्रकल्पासंदर्भातील रॉयल्टी देयके व संबंधित अहवालांची माहिती संकलित करून नियमानुसार संबंधित प्राधिकरणाकडे पुन्हा सादर करण्यात येईल. तसेच, आवश्यक ती सर्व कागदपत्रे व अहवाल प्रचलित नियमांनुसार अद्ययावत ठेवून संबंधित विभागांना उपलब्ध करून देण्यात येतील, असे त्यांनी स्पष्ट केले.

प्रश्न क्र. ५

**श्री. बाबासाहेब कुकडे**

प्रादेशिक समन्वय अधिकारी, एमपीसीबी. बोर्ड, पुणे

समिती सदस्य

**प्रश्न:**

श्री. बाबासाहेब कुकडे यांनी नमूद केले की, प्रकल्पासाठी कार्यरत असलेल्या सर्व कंत्राटदारांनी रेडी मिक्स कॉंक्रिट (RMC) प्लांट्स संदर्भातील लागू मार्गदर्शक तत्त्वांचे तसेच स्टोन क्रशर युनिट्ससाठी विहित करण्यात आलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. त्यांनी पुढे निदर्शनास आणून दिले की, दिनांक १७/१०/२०२५ रोजी जारी करण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्त्वांचे काही ठिकाणी पालन होत नसल्याच्या बाबी समोर आल्या आहेत.

त्यामुळे, संबंधित मार्गदर्शक तत्त्वांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रकल्प प्रस्तावकांकडून कोणती देखरेख यंत्रणा राबविण्यात येत आहे तसेच नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित कंत्राटदार किंवा युनिट्सविरुद्ध योग्य कायदेशीर व प्रशासकीय कारवाई करण्यात येणार आहे काय, याबाबत स्पष्टीकरण मागविण्यात आले.

**उत्तर देणारे : श्री. गायकवाड सर**

उप अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (MSRDC)

**उत्तर:**

श्री. गायकवाड यांनी उत्तरादाखल स्पष्ट केले की, प्रकल्पांतर्गत कार्यरत असलेल्या रेडी मिक्स कॉंक्रिट (RMC) प्लांट्स व संबंधित बांधकाम उपक्रमांवर पात्र स्थापत्य अभियांत्रिकी अधिकाऱ्यांमार्फत नियमित देखरेख ठेवण्यात येत आहे. सिमेंटची गुणवत्ता, कॉंक्रिट ग्रेड, बांधकाम साहित्याची गुणवत्ता तसेच इतर तांत्रिक बाबींची पडताळणी करून विहित मानके व तांत्रिक निकषांचे पालन सुनिश्चित करण्यात येत आहे.

तसेच, सर्व RMC प्लांट्सना कार्य सुरू करण्यापूर्वी आवश्यक त्या सर्व वैधानिक परवानग्या व मंजुरी प्राप्त करणे बंधनकारक करण्यात आले असून, लागू पर्यावरणीय व तांत्रिक मार्गदर्शक तत्त्वांचे काटेकोर पालन करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्प प्रवर्तकांकडून गुणवत्ता नियंत्रण व नियामक अटींचे पालन सुनिश्चित करण्यासाठी प्रभावी देखरेख यंत्रणा कार्यरत असल्याचे त्यांनी नमूद केले. तसेच, विहित नियमांचे उल्लंघन अथवा

कोणतीही त्रुटी निदर्शनास आल्यास, संबंधितांविरुद्ध लागू कायदेशीर तरतुदी व नियमांनुसार आवश्यक ती कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

| | |
|---|---|
| (श्री.कार्तिकेय लंगोटे) | (श्री. बाबासाहेब कुकडे) |
| समन्वयक | समिती सदस्य |
| उपप्रादेशिक अधिकारी, पुणे- १, | प्रादेशिक अधिकारी, |
| महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे |

(मा.ज्योती कदम)

अध्यक्ष

मा. निवासी उपजिल्हाधिकारी-पुणे तथा

अपर ज़िल्हादंडाधिकारी,पुणे